हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

# मासिक नवस्नेह

६०

**ब्रह्मतेजो बलंबलम्**

वर्ष १० वे : अंक २
मे २०२४

स्वागतमूल्य ₹. 30/-



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१–२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# कोल्हापूर चित्पावन संघातर्फे गुढी पाडव्याच्या शुभदिनी हिंदू नववर्ष दिनदर्शिकेचे प्रकाशन



भिंतीवर अडकवण्याची बहुतेक सर्व कॅलेंडर ही इंग्रजी महिन्याप्रमाणे असतात त्यामुळे मराठी महिन्यांची ओळख तसेच तिथी,नक्षत्र या गोष्टी हळूहळू विस्मरणात जात आहेत. हे लक्षात घेऊन चैत्र वैशाख याप्रमाणे प्रामुख्याने मराठी महिन्यांची दिनदर्शिका असावी अशी संकल्पना कला कल्पना या जाहिरात संस्थेचे संजीव चिपळूणकर मांडली व ती सलग दुसऱ्या वर्षी परिपुर्ण केली. या दिनदर्शिकेत सर्व मुहूर्त, प्रत्येक महिन्याचे राशिभविष्य, विविध दैवतांची ठिकाणे , तेथे जाण्याबाबतची माहिती, शुभ दिवस, लग्न, वास्तू शांती व विविध समारंभाचे मुहूर्त अशी परिपूर्ण माहिती दिली आहे. अशा दिनदर्शिकेची आवश्यकता होती त्यामुळे किमान पुढील पिढीला मराठी महिने व परंपरांची माहिती होईल. व अशा स्वरूपाची दिनदर्शिका ही कदाचित महाराष्ट्रात एकमेव असावी असे मत चित्पावन संघाचे श्री नंदकुमार मराठे मांडले. सर्वांनीच या कामाचे कौतुक केले.

या दिनदर्शिकेचे प्रकाशन ज्येष्ठ लेखिका सौ. मंजुश्री गोखले यांच्या हस्ते व ज्येष्ठ डॉक्टर नंदकुमार जोशी यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष मकरंद करंदीकर यांनी केले, अशा उपक्रमाची आवश्यकता संस्था सेक्रेटरी प्रसाद भिडे यांनी व्यक्त केली, संजीव चिपळूणकर यांनी अनेकांच्या मदतीतून ही दिनदर्शिका साकारली असून त्यामागची भूमिका सांगून सर्वांनी त्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा असे सांगितले, शेवटी केदार जोशी यांनी आभार मानले.

# सर्व ब्राह्मण समाजाचे आराध्य दैवत असलेल्या भगवान श्री परशुरामांचा जन्मोत्सव



यावर्षी सर्व ब्राह्मण समाज संघटनांतर्फे शुक्रवार, दि. १० मे २०२४ रोजी येणारा भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळा भव्य प्रमाणात साजरा होणार आहे. कोल्हापूर चित्पावन संघाच्या पुढाकारातून कोल्हापुरातील सर्व ब्राह्मण पोटजातींतर्फे सर्वांनी सहकुटुंब, सहपरिवार एकत्र येऊन हा जन्मोत्सव साजरा करण्याचे आवाहन संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, कार्यवाह श्री. केदार जोशी आणि संचालक श्री. नंदकुमार मराठे यांनी सर्व ब्राह्मण समाज बांधवांना केले आहे.

या कार्यक्रमास फक्त कोल्हापुरातीलच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यातील ब्राह्मण समाज बांधवांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन आपली समाजशक्ती दाखववावी असे आवाहन समस्त ब्राह्मण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. समस्त ब्राह्मणांनी शुक्रवार, दि. १० मे २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता पेटाळा ग्राऊंड, महाद्वार रोड येथून सुरू होणाऱ्या श्री परशुराम पालखी व शोभायात्रेत सहभागी व्हावे, ही विनंती.

आपल्या संपूर्ण ब्राह्मण समाजाची संघटनशक्ती दाखवण्याची हीच वेळ आहे हे लक्षात असू द्या ! त्यासाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. सर्वांनी हजारोंच्या संख्येने आपला सहभाग नोंदवावा ही विनंती.

**अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी मोबा. क्र. ७६२०५४६२२५ व ८४८४८५१५९१ वर संपर्क साधावा.**

**आवाहन :** या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी खर्चाचे मोठ्या प्रमाणात नियोजन करावे लागणार असून त्यासाठी ज्ञाती बांधवांना आवाहन करण्यात येते की त्यांनी उदार हस्ते यासाठी देणगी देऊन सहकार्य करावे. आपल्या देणग्यांना ८० जी नुसार आयकर सवलत मिळणार आहे.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष १० वे : अंक २ : मे २०२४**





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)
9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


### अनुक्रम


१) **संपादकीय** /४

२) **भ्रमनिरास** /५ - सौ. कमल हर्डीकर

३) **माझी बँकेतील मुशाफिरी** /९
- शब्दांकन : श्रीकांत शिंत्रे, सौ. ज्योत्स्ना शिंत्रे

४) **मुलांचे पान** / १२

५) **ज्ञानसूर्याची सावली** /१४ - सौ. मंजुश्री गोखले

६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / १७
- सौ. मंजुश्री गोखले

७) **दोन हजाराचा धडा** / १८ - कौस्तुभ ताम्हनकर

८) **साहित्यिकांची टोपणनावे** / २० - संकलित

९) **मुस्लिम स्त्री कलाकार** /२१ - प्रकाश गानू

११) **देशभक्त दिनकरशास्त्री रानडे** / २३
- प्रकाश देशपांडे

१२) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**




या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १९ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

कसे आहात हा प्रश्न विचारणंच वेडेपणाचं आहे. उन्हानं वितळतोय आपण सगळी बरं तर बरं ! त्वचा कातडी आहे. नाहीतर खरंच वितळून गेली असती. पण या सूर्याला कोण आवरणार? ग्लोबल वार्मिंग कसलं? ग्लोबल वॉर्मिंग चालू आहे. तेव्हा सकाळी दहा नंतर बाहेर पडणे नाही आणि हो, जेवताना आमरसावर ताव मारून वामकुक्षी घेणे एवढंच आपल्या हातात आहे आणि हातात जर नवस्नेह असेल तर अगदी छान. आमरसाचा गोडवा साखर न घालताच वाढेल. असो.

मित्रांनो, आपण पुढच्या महिन्यापासून नवस्नेह मध्ये एक नवीन लेखमाला सुरू करत आहोत. सप्त चिरंजीवांची. आपल्या प्राचीन ग्रंथांत अशी मान्यता आहे, की आपल्या पुराणात सात चिरंजीव व्यक्तीरेखा आहेत. त्यांचा मागोवा माहिती आणि वेगळ्या दृष्टीकोनातून केलेला त्यांच्या चिरंजीवत्वाचा विचार अशी ती मालिका असणार आहे आणि ती लिहिताहेत. आपल्या नवस्नेहच्या मुंबई येथील लेखिका ज्योत्स्ना शिंत्रे. तुम्हाला ही लेखमाला नक्कीच आवडेल.

आपल्या नवस्नेहचं प्रत्येक पान वाचनीय असतं असं बऱ्याच दिग्गज वाचकांकडून आम्हाला अभिप्राय येतात. अर्थात त्यामुळंच तर काम आणखी चांगलं करायची प्रेरणा मिळते. असेच अभिप्राय आम्हाला देत जावा. कारण तुम्हाला माहीत आहे

**जे जे उत्तम उदात्त, उन्नत,**

**महन्मधुर ते ते**

सगळं नवस्नेहमध्ये यावं हे आमचं ध्येय आहे.

मित्रांनो, हा मे महिना. मे महिना म्हणजे सुट्टीचा महिना. मे महिना म्हणजे उन्हाचा महिना. मे महिना म्हणजे आमरसाचा महिना आणि मे महिना म्हणजे पाहुण्यांचा आणि सहलींचा महिना. तेव्हा तळपत्या उन्हात का होईना पण मे महिना आपण आनंदात अनुभवूया. परवाच्या रामनवमीला विज्ञानाचा चमत्कार आणि भक्तीचा साक्षात्कार एकवटून आपण सूर्य किरणांनी बालक रामाच्या मूर्तीला तिलक लावलेला पाहिला. खरं तर आरशावरून परावर्तित होणाऱ्या प्रकाश किरणांचा कोन साधून ही किमया केली होती. यात काही फार मोठं विज्ञान नव्हतं. पण आपल्याकडे इतक्या संख्येनं आणि इतकी मोठी आणि श्रीमंत मंदीरे असूनही ने-आण पर्यंत कुणाला सुचलं नाही ते साध्य केलं गेलं. इथं कमाल विज्ञानाची तर आहेच पण त्याहीपेक्षा ती व्हिजनची, दृष्टीची कमाल आहे. त्यात काय विशेष? असं नाक उडवत म्हणणाऱ्यांना हे काय कळणार म्हणा? असो. अशाच व्हिजनची आपल्या देशाला सध्या गरज आहे. मग बालकरामालाच काय पण सूर्यदेव आपल्या भारत देशालाही कीर्तीचा तिलक लावेल. आपण प्रतिक्षेत राहूया. परवा एक छान व्याख्या वाचायला मिळाली. तुम्हीही वाचली असेल, नसली तर वाचा. राम राम असं आपण दोन वेळा का म्हणतो. त्याचा उलगडा असा.

मराठी मुळाक्षरांत ‘र’ हे अक्षर २७ वे येते
‘आ’ हे अक्षर २ रे येते
‘म’ हे अक्षर २५ वे येते

एकूण ५४ ही संख्या येते.

एकदा राम म्हटले की ५४ संख्या येत. दोन वेळा राम राम म्हटले की ५४+५४=१०८ ही जपाची संख्या येते. म्हणजे दोन वेळा राम राम म्हटले की १०८ वेळा रामनाम घेतल्यासारखे होते. मग भेटल्यावर ‘हाय’ असे कण्हल्यासारखे किंवा हॅलो असे त्या ग्रॅहम बेल च्या प्रेयसीचे नाव घेण्यापेक्षा ‘राम राम’ केव्हाही चांगले. नाही का? तेव्हा आता निरोप घेते.

राम राम !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# भ्रमनिरास

**(लेखांक ४)**

घरोघरी मातीच्या चुली, कुठेही जा, पळसाला पाने तीन. हे वाक्प्रचार एखादी गोष्ट जेव्हा सर्वत्र आढळते त्यावेळी वापरतो. आई-वडील आणि त्यांची मुलं म्हणजे कुटुंब. जेव्हा दोन किंवा अधिक कुटुंबं एकत्र, एका घरात राहतात तेव्हा परिवार होतो. आई-वडील, मुलगा, सून, नातवंडं यांचा परिवार होतो. यामध्ये आई-मुलगा, सासू-सून, वडिल-मुलगा यांच्यामध्ये गैरसमज निर्माण होतात. या गैरसमजामागील मुख्य कारण पैसा, सोनं, नाणं, मालमत्तेची वाटणी हेच असतं. एकटा एक मुलगा असेल तर वाटणीचा प्रश्न येत नाही, पण दोन मुलगे असतील तर अगदी क्षुल्लक कारणावरून गैरसमज होतात. नाती तुटतात. आजपासून तू माझा भाऊ नाहीस, तू माझी आई नाहीस, कुण्या जन्मीची वैरीण आहेस अशी टोकाची भाषा सुरू होते. दुसऱ्याच्या डोळ्यातलं कुसळ दिसतं, पण आपल्या डोळ्यातलं मुसळही दिसत नाही. या उक्तीनुसार आपणही चुकलो आहोत हे मानायला मन तयार होत नाही. माझ्यावर कायम अन्यायच झाला, या विचारानं भ्रमचित्त झालेल्या आपल्या पोटच्या गोळ्याचा भ्रमनिरास, पतीच्या मृत्यूचं दुःख बाजूला सारून, करणाऱ्या आईची ही गोष्ट.

वीस-पंचवीस हजार वस्तीचं छोटसं गाव. विनायकराव आणि रामभाऊ अगदी सख्खे शेजारी. रोज सकाळी दोघे मिळून कृष्णेवर जाऊन स्नान करून दत्तदर्शन घेऊन येत. दिवसभर शेतीकडे लक्ष देऊन काम करत. विनायकरावांना तीन मुलं - गणेश फक्त सहा वर्षांचा असताना आधीच्या दोनही मुलांचा अल्पशा आजाराने मृत्यू झाला. पाठोपाठ पत्नीचेही निधन झाले. जगण्याचा एकमेव आधार राहिला गणेश. सगेसोयरे - गणेशसाठी तर घरी आईच्या मयेने करणारं माणूस पाहिजे आणि अजून केवढं तरी आयुष्य काढावं लागणार आहे, तेव्हा दुसऱ्या विवाहाचा विचार करा - असा तगादा लावत होते. यावर विनायकरावांचं उत्तर ठरलेलं असे ते म्हणजे, 'लग्नानंतर घरी येणारी ती स्त्री गणेशला आईची माया देईल कशावरून? आणि माझ्या नशीबात संसार सुख असतं तर गुरुदेव दत्तानी माझी दोन मुलं आणि पत्नी यांनाच माझ्या आयुष्यात ठेवलं नसतं का? तेव्हा मी दुसरा विवाह करणारच नाही. गणेश हेच माझं सर्वस्व. त्याची आईही मीच आणि बापही मीच !'

रामभाऊंना एक मुलगा होता. त्याच्या पाठीवर पाच वर्षांनी पुन्हा त्यांच्या पत्नीला दिवस राहिले होते. दोन चार दिवसांत कधीही त्यांची प्रसूती झाली असती. नेहमीप्रमाणे रामभाऊ आणि विनायकराव कृष्णेवर स्नानासाठी निघाले होते. विनायकराव अगदी अबोलपणे चालत होते. मनात विचारांचं माजलेलं काहूर चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होतं. रामभाऊ म्हणाले, ''अरे विनायक, असा गप्प राहू नको रे. मनात असेल ते बोलून टाक आणि मोकळा हो ! माझ्यापाशी बोलणार नाहीस, तर कुणापाशी बोलणार? मला काय वाटेल याचा जराही विचार न करता बोल. माझ्याकडून करता येण्यासारखं असेल ते मी निश्चितपणे करेन. निःशंक आणि निर्धास्त होऊन बोल !''

विनायकराव शांतपणे एकेक शब्दावर जोर देत बोलू लागले.

''गणेशच्या आधीची माझी दोन्ही मुलं बालवयातच गेली. माझ्या गणेशला निरोगी दीर्घायुष्य लाभावं आणि त्याचं संगोपन आणि शिक्षण करण्यासाठी मला मानसिक आणि शारीरिक बळ लाभू दे अशी मी रोज दत्तात्रेयाकडे प्रार्थना करतो. काल रात्रीपासून माझ्या मनांत एक विचार अखंड येतो आहे, तो विचार तुला सांगून माझ्या मनावरचा ताण मला दूर करू दे.

''तुझी पत्नी आणि माझ्या वरदा वहिनी या

दोन चार दिवसांत कधीही प्रसूत होतील. तुम्हाला यावेळी मुलगी झाली तर तिला मी माझी सून करून घेईन. तुझ्या लेकीचं सौभाग्य बळकट असेल, तर माझ्या गणेशला दीर्घायुष्य लाभेल. हा माझ्या मनातला विचार तुझ्यापाशी बोलून मी आता शांत झालो. माझ्यावर तू रागावलास तरी चालेल, पण मला जे वाटलं ते मी बोललो.''

यावर रामभाऊ अगदी खळखळून हसले आणि म्हणाले, ''अरे विनायका, गुरुदेवांच्या साक्षीने मी आज तुला शब्द देतो – माझ्या पत्नीला या खेपेला मुलगी झाली तर ती तुझी सून. तुझ्या गणेशाची पत्नी होऊन तुझ्या घरी येईल. आम्ही दोघे तिची तुझ्याकडे पाठवणी करू, मग तर झालं. आता शांत हो. या रामभाऊचा शब्द आहे हा. शिवाय गणेशसारखा गुणी मुलगा जावई म्हणून मिळणार असेल तर माझी पत्नी वरदा या गोष्टीला अगदी मनापासून संमती देईल हे निश्चित ! कुठल्याही आईला लग्नानंतरही सासरी गेलेली आपली मुलगी आपल्या डोळ्यासमोर असावी असंच वाटत असणार ना?''

रामभाऊंच्या या शब्दांनी विनायकरावांचं ताणलेलं मन सैल झालं. जे त्यांच्या चेहऱ्यावरूनही स्पष्टपणे जाणवत होतं. भरल्या डोळ्यांनी विनायकरावांनी रामभाऊंचा हात आपल्या हाती घेऊन कृतज्ञतेने हलकेच थोपटला.

पुढे पाच–सहा दिवसांनी वरदा वहिनींनी त्यांचंच रूप घेऊन आलेल्या मुलीला जन्म दिला. घरांत सुहेर आल्याने रामभाऊ दहा दिवस कृष्णेवर स्नानाला येत नसत, पण विनायकराव नियमितपणे कृष्णास्नान करून भरल्या डोळ्यांनी दत्तात्रेयाचं दर्शन घेत असत. नामकरण विधी होऊन मुलीचं नाव शारदा ठेवलं. गणेश आणि शारदांच्या वयात जवळजवळ सात वर्षांचं अंतर, पण विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात याविषयी कुणालाच गैर वाटत नव्हतं. दिसामाशी वाढणारी शारदा तीन वर्षांची झाली. ती फक्त शेजारीच असलेल्या विनायकरावांच्या घरी यायची. अगदी रोजचा रतीब असल्यासारखी हातांवर बेदाणे ठेवले की आईकडे परत जायची. बेदाणे नसले तर मनुकाही चालायच्या, पण खाऊ हा हवाच. शारदा शाळेत जाऊ लागल्यावर साहजिक तिचा हा दिनक्रम थांबला.

आपण वकीलच व्हायचं असा अगदी लहानपणापासूनच गणेशनं मनोमन निश्चय केला होता आणि त्यासाठी तो अगदी झटून अभ्यास करायचा. मॅट्रीकला अत्युत्तम गुणांनी पास झाल्यानंतर जवळच्या शहरात पुढील शिक्षणासाठी गणेश गेला. विनायकरावांनी लेकाला सांगितले, ''पोटाचे हाल करू नकोस. मनापासून अभ्यास कर. अधून मधून तू मला भेटायला ये किंवा मी येईन. शेवटची परीक्षा झाली की वकिलीची सनद घेऊनच गावाकडे ये.'' वडलांच्या इच्छेप्रमाणे गणेशने वकीलीचे शिक्षण पूर्ण केले. गावातला पहिला वकील म्हणून गावकऱ्यांनी छोटासा समारंभ आयोजित केला. घराच्या बाहेरच्या खोलीत गणेशने आपले कार्यालय थाटले. शारदाही मॅट्रीक पास झाली. आता सारे मार्गी लागले आहे या विचाराने विनायकरावांनी गणेशकडे लग्नाचा विषय मोठ्या खुबीने मांडला. ते म्हणाले, ''मला वाटतं, जिच्या आई–वडिलांना आपण चांगले ओळखतो आणि ज्या मुलीचं एकूण वागणं बोलणं आपण रोज खूप जवळून पहात आहोत, त्या शारदेला सून म्हणून घरात आणावी असं मला वाटतं. तसं मी रामभाऊंना विचारू का?'' गणेशही सूज्ञपणे बोलून गेला, ''शारदा आणि रामकाका काकूंना चालणार असेल तर माझी काही हरकत नाही !''

अगदी साधेपणानं लग्न पार पडलं आणि शारदा गणेशची पत्नी होऊन माप ओलांडून अलिकडच्या घरातून पलीकडच्या घरात आली. घरात शारदा धरून तीन माणसं. संपूर्ण घराची जबाबदारी शारदानं स्वीकारली. अनेक वर्षांनी विनायकराव निर्धास्त झाले. गावातली वस्ती आणि आजूबाजूच्या वाड्यांमुळे गणेशचा वकिली व्यवसायात चांगला जम बसला. एक अभ्यासू आणि उलट तपासणी घेण्यात पारंगत अशी त्याची पंचक्रोशीत ख्याती झाली. गणेश वकिल

साहेबांच्याकडं केस सोपवली की जिंकण्याची हमी असं समीकरण झालं.

व्यवसाय सुरू केल्यानंतर अवघ्या १२-१६ वर्षात गणेशनं गावाबाहेर जागा घेऊन मोठं घर बांधलं. कुसुम, किरण, केशव आणि सर्वात धाकटी कांचन या चार नातवंडांत आजोबा रममाण झाले. गावात होणाऱ्या लहान मोठ्या कार्यक्रमांत वकिलसाहेबांचा पुढाकार असायचा. स्वातंत्र्य लढ्याची चळवळही जोर धरत होती. स्वातंत्र्य मिळालंच पाहिजे आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्या प्रत्येकाची काय जबाबदारी असणार याविषयी ते वरचेवर तरुणांचे आणि गावकऱ्यांचे समुपदेशन करत. स्वातंत्र्य मिळालेल्या दिवशी प्रभात फेरी, झेंडावंदन प्रत्येक शाळेत आणि घरांघरांत पेढे देण्याचं कामही त्यांच्या पुढाकारानं झालं. सारं कसं छान चालू होतं. स्वातंत्र्य मिळून जेमतेम ६ महिने होण्याच्या आतच ३० जानेवारी १९४८ रोजी एक घटना घडली.

या घटनेची निषेध सभा संपूवन घरी जात असतानाच विशिष्ट जातीच्या लोकांची घरे एकामागोमाग जाळली जात असल्याची वार्ता त्याला समजली. आपले घर गावाबाहेर असल्याने अजून संतप्त जमाव त्याठिकाणी पोहोचला नसेल अशी वकिलसाहेबांनी स्वत:ची समजूत काढली. घरपाशी सारं ठीक होतं. घरी सर्वजण आहेत ना, याची खात्री करून घेत त्यांनी दरवाजाला कडी घातली.

काही वेळात 'वकिलसाहेब' अशा पाठोपाठ हाका येऊ लागल्या. दार उघडावे की नाही, या संभ्रामात असलेल्या गणेशने मोठा दरवाजा उघडला. समोर धुळप्पा आणि त्याचे दोन साथीदार. धुळप्पाने गणेशचा पक्षकार रायबावर केस घातली होती. खालच्या कोर्टात केस हरलेल्या धुळप्पाला शिक्षा ठोठावली गेली. बहुतेक हा राग मनांत धरून त्याने संधी साधली. आत येताच त्याने गणेशला मारायला सुरुवात केली. इतर दोन साथीदार घरांत शिरले. रायबा, भरमू, साताप्पा इ. पाच-सहा जणांना मनांत डूख धरलेला धुळप्पा वकिलसाहेबांच्या घरी गेल्याची कुणकुण लागताच ते सर्वजण गणेशच्या घरी धावले. धुळप्पाला दूर ढकलून त्यानं वकिल-साहेबांचा ताबा घेतला आणि त्यांना झोपवले. शारदा, मुलं आणि विनायकरावांना त्यांच्याजवळ थांबवून भरमूलाही तिथेच थांबवले. घरात जाऊन अन्न, धान्य, कपडे यांची नासाडी करणाऱ्या धुळप्पाच्या साथीदारांना त्याच्यासह मरेस्तोवर बुकलून बाहेर काढले. काही वेळात फौजदार आणि पोलिसफाटा आल्याने सारे काही शांत झाले. असंख्य घरं खूप वेळ धुमसत होती.

आता या गावात रहायचं नाही. व्यवसायाच्या आणि मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीनं त्यांनी कोल्हापूरमध्ये स्थायिक होण्याचे ठरविले. मुलांचा शालेय प्रवेश वेळेत होण्यासाठी मे महिन्यात सर्व बस्तान बसणे आवश्यक होतं आणि त्याप्रमाणे झालेही. किरण हुशार आणि हरहुन्नरी. मॅट्रीक आणि त्यानंतर इंटर सायन्सला त्यानं अगदी उत्तम गुण मिळवल्याने पुण्याला इंजिनिअरींगला कॉलेजला सहज प्रवेश मिळाला. पहिलं वर्ष सुरळीत पार पडलं आणि दुसऱ्या वर्षी गोवा-मुक्ती संग्राम चळवळीत तो सक्रिय झाला आणि ओळीने दोन वर्षे नापास झाला. पण वेळीच सावरला आणि इंजिनिअर झाला. लगेच मनासारखी नोकरी लागली. पाठोपाठ केशवही इंजिनिअर झाला. त्याला पुण्यात एका मोठ्या कारखान्यात रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट विभागात नोकरी लागली. त्यानं केलेल्या संशोधनामुळं पगार वाढ आणि नोकरीत कायम झाला. कांचन बी.कॉम. झाली. तिला एका बँकेत नोकरी मिळाली आणि जेमतेम नोकरीचं एक वर्ष पूर्ण होता होता तिचा विवाह झाला.

गणेश आणि शारदा, एक केशवचं लग्न सोडल्यास सर्व सांसारिक जबाबदाऱ्यांतून मुक्त झाले होते. विनायकराव तृप्त होते. एक दिवस झोपेतच ते गुरुदेव चरणी विलीन झाले. आता आई-बाबा दोघांनीही पुण्यात येऊन आपल्या बरोबर रहावे असा केशवचा आग्रह सुरू होता. यादृष्टीने त्याचे प्रयत्न सुरू होते. एका बँकेकडून कर्जही मंजूर झाले होते. या

रक्कमेतून त्याने अर्ध्याहून अधिक बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीच्या तळमजल्यावरील सदनिकेसाठी नाव नोंदणी केली. ही सदनिका तशी प्रशस्त होती. दोन बेडरूम, मोठा हॉल, जेवणाचे टेबल राहील असे प्रशस्त स्वयंपाकघर आणि दोन्ही बेडरूमना लहान बाल्कनी होती. त्याला एकूण घर छान वाटले. पण सर्व लहान सहान गोष्टी पूर्ण होऊन सदनिकेत रहायला येण्यासाठी किमान दीड ते दोन वर्षांचा कालावधी लागणार होता. एवढी दोन वर्षही आता आई-बाबांना दूर ठेवण्याची त्याची तयारी नव्हती. त्यासाठी त्याने भाड्याच्या घरांचा शोध घेणे सुरू केले. पण बहुसंख्य घरं दुसऱ्या किंवा तिसऱ्या मजल्यावरची म्हणजे जिन्याची चढउतार आली. या वयांत नकोच तो त्रास.

एकदम केशवच्या मनात एक छान कल्पना आली आणि लगेच त्याने किरणला पत्र लिहायला घेतले. त्याचे त्यालाच हसू येऊ लागले. उगाचच आपण भाड्याची घरं पहात राहिलो. किरणला राहण्यासाठी पाच खोल्यांचा छान बंगला आहे. मागे-पुढे मोकळी जागा. आजी-आजोबांचं मन रमवायला घरात तीन गोड नाती आणि काय हवं? आई-बाबा तिथे इतके रमतील की कदाचित पुण्याला रहायला काहीशा नाराजीनेच येतील. आता भाड्याचे घर बघायचं कारण नाही. त्याने पत्र लिहून पूर्ण केले. कामावर जाताना लगेच पोस्ट केले.

आठ दिवसांनी किरणचे पत्रोत्तर आले. त्याने पाकिट उघडून पत्र वाचायला सुरुवात केली. प्रत्येक ओळ वाचताना केशवचे डोळे भरून येत होते. भरून येणारे डोळे पुसतच त्याने पत्र वाचून संपवले.

**- सौ. कमला हर्डीकर,**
मोबा. ९६८९३६९९२६

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

**शुक्रवार, दि. 10 : अक्षय्यतृतीया**
**मंगळवार, दि. 14 : पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर,**
**0231-2546585**

**दिनविशेष (मे २०२४)**
**चैत्र - वैशाख १९४६**
**शोभननाम - क्रोधीनाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**बुधवार दि. १ :** महाराष्ट्र दिन, कामगार दिन, मराठी राजभाषा दिन, **सोमवार दि. ६ :** राजर्षी छ. शाहू महाराज पुण्यदिन, श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी, **मंगळवार दि. ७ :** अमावास्या, संत चिले महाराज पुण्यतिथी, **बुधवार दि. ८ :** गुरुदेव रवींद्रनाथ टागोर जयंती, **गुरुवार दि. ९ :** छ. शिवाजी महाराज जयंती (परंपरेने), कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यदिन, **शुक्रवार दि. १० :** महात्मा बसवेश्वर जयंती, अक्षय्यतृतीया श्री परशुराम जयंती, **शनिवार दि. ११ :** राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन, **सोमवार दि. १२ :** परिचारिका दिन, श्री आद्य शंकराचार्य जयंती, **मंगळवार दि. १४ :** छत्रपती संभाजीराजे जयंती, **बुधवार दि. १५ :** शंकर महाराज पुण्यतिथी, **मंगळवार दि. २१ :** नृसिंह जयंती, राजीव गांधी स्मृतिदिन, दहशतवाद विरोधी दिन, **गुरुवार दि. २३ :** बुद्ध पौर्णिमा, **रविवार दि. २६ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.५३), **सोमवार दि. २७ :** पंडित नेहरु पुण्यदिन, **मंगळवार दि. २८ :** स्वा. सावरकर जयंती, **गुरुवार दि. ३० :** गोवा राज्य दिन, **शुक्रवार दि. ३१ :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती, तंबाखू सेवन विरोध दिन.

# माझी बँकेतील मुशाफिरी

## (एका बँक अधिकाऱ्याचे विलक्षण अनुभव)

काही बँका आकाराने मोठ्या असतात. अर्थात त्यांच्या टॉप मॅनेजमेंटचे लोकही डबल डिजिटमध्ये असतात. त्यांच्यामध्ये हेवेदावे, चढाओढ, मत्सर खूप असतात. त्यांच्यामध्ये वेगवेगळे गट असतात आणि त्यांची सर्वोच्च पदाला पोहोचण्याची तीव्र स्पर्धा असते. शाखा व्यवस्थापक मात्र यांच्या खेळामध्ये फक्त प्यादी/ मोहरे असतात आणि त्यांचा उपयोग आपापले हितसंबंध जपण्याच्या हेतूने, हे गट करतात, पण त्याचा विलक्षण त्रास शाखांना होतो याची त्यांना पर्वा नसते. म्हणतात ना, शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड ! खाणाऱ्याला न फिकीर, ना दया, ना देणेघेणे !

असेच एक उदाहरण आता आपण पाहूया. वरच्या ऑफिसमधून एक खाते उघडण्यास सांगण्यात आले. खाते उघडल्या उघडल्या त्या खात्याचा एक कोटी रुपयाचा कर्ज प्रस्ताव, शिफारस करून चोवीस तासात पाठवण्यास सांगण्यात आले. ना शाखेकडे वेळ होता, मार्केटमध्ये फिरून खातेदाराबद्दल चौकशी करायला, ना तीन चार महिनेतरी खाते चालल्यावर त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायला. खातेदाराने फक्त बॅलन्स शीट दिली होती, ती मात्र वरपांगी समाधानकारक दिसत होती. नाईलाजाने शाखेला प्रस्ताव पाठवायलाच लागला, शिफारशीसह ! मात्र शाखेने हे स्पष्ट केले की जरी बॅलन्स शीट समाधानकारक दिसत असली तरी खात्याच्या व्यवहारचा काहीच अनुभव नाही आणि म्हणून कुठलीही टिप्पणी करणे अवघड आहे. वरचे ऑफिस आमच्याकडून प्रस्ताव येण्याचीच वाट बघत होते. कर्जाला ताबडतोब मंजुरी देण्यात आली आणि एक कोटी रु. ची, ९० दिवसांच्या डी. ए .एल. सी. ची लिमिट देण्यात आली.

इथे डी.ए.एल.सी. म्हणजे काय ते नॉन बँकर वाचकांकरता सांगणे आवश्यक आहे. जेव्हा ग्राहकाला माल हवा असतो पण त्याचे पैसे ताबडतोब देणे शक्य नसते आणि विक्रेत्याला माल विकायचा असतो पण उधारीवर माल विकायचा नसतो कारण त्याला ग्राहकांचा भरवसा नसतो. तेव्हा ग्राहकाची बँक पुढे येते आणि पतपत्र (एल.सी.) द्वारे विक्रेत्याला आश्वासित करते की ती त्याला, ठराविक दिवसाच्या मुदतीनंतर (येथे ९० दिवसानंतर), पैसे देईल, मग ग्राहक पैसे देवो किंवा न देवो. या पतपत्राच्या भरवश्यावर विक्रेता उधारीवर माल देतो आणि नव्वद दिवसानंतर त्याला बँक पैसे देते. याला पतपत्र मर्यादा म्हणजे एल. सी. लिमिट म्हणतात आणि ९० दिवसानंतर पैसे देण्याची वचनबद्धता असते म्हणून ९० दिवसांची डी.ए.एल.सी. लिमिट.

ही लिमिट अशा प्रकारे वापरली जाते. खरेदीदारांची बँक त्याच्या वतीने विक्रेत्याला, त्याच्या नावे, ९० दिवसाचे पतपत्र जारी करते, पूर्ण तपशीलासह – कुठला माल, त्याची किंमत – प्रति नग आणि एकूण नग, कोठून कुठे पाठवायचे, किती दिवसात, कसे, पैसे किती दिवसात चुकते करायचे, इतर शर्ती इ. आणि बँक या पत्राद्वारे हमी घेते की जर शर्तीनुसार माल विकला तर ठरलेल्या मुदतीनंतर बँक विक्रेत्याला पैसे द्यायला बांधील आहे. मग विक्रेता, खरेदीदाराला माल पाठवतो आणि सर्व कागदपत्रे– ९० दिवसांची हुंडी, ट्रान्सपोर्ट रिसिट, इन्व्हॉईस इ. इ. आपल्या बँकेद्वारा एल.सी. उघडणाऱ्या बँकेकडे पाठवतो. ही बँक हे कागदपत्र खरेदीदाराला सादर करते आणि त्याने हुंडी स्वीकृत केल्यावर, हुंडी आपल्याकडे ठेवून, बाकीची कागदपत्रे खरेदीदाराला देते. यातील ट्रान्सपोर्ट रिसीट तो वाहतूक कंपनीला देऊन प्रत्यक्ष माल मिळवतो, विकतो आणि आलेले विक्रीचे पैसे तो बँकेत जमा करतो आणि त्यातून ९० व्या दिवशी बँक विक्रेत्याला पैसे देते. अर्थात जरी खातेदाराने पैसे नाही भरले तरी बँक विक्रेत्याला द्यायला बांधील असते. जेव्हा माल एका वेगळ्या ठिकाणाहून दुसऱ्या वेगळ्या ठिकाणी पाठवायचा असतो तेव्हा, वाहतूक कंपनी तो माल आपल्या एका ठिकाणच्या गोदामात घेऊन, यथावकाश, आपल्या ट्रकद्वारा, दुसऱ्या ठिकाणच्या

गोदामात पाठवते आणि या दुसऱ्या गोदामातून, ट्रान्सपोर्ट रिसिटच्या आधारावर आणि त्याच्या बदल्यात हा माल खरेदीदाराला मिळतो. अर्थात ट्रान्सपोर्ट रिसिट खरेदीदाराने वाहतूक कंपनीला देणे आवश्यक असते, त्याशिवाय मालाची डिलिव्हरी होत नाही. म्हणून ट्रान्सपोर्ट रिसिट हा कायदेशीर दस्तऐवज असे समजण्यात येते.

परंतु जर विक्रेता आणि खरेदीदार एकाच शहरात रहात असतील तर वाहतूक कंपनी माल थेट, पुरवठादाराकडून घेऊन थेट खरेदीदाराकडे पोहोचवते, फक्त डिलिव्हरी चलन द्वारा, येथे ट्रान्सपोर्ट रिसिट बनतच नाही.

या प्रकरणात आमच्या खातेदाराचा पुरवठादार आमच्याच शहरातील होता. त्यामुळे वितरण डिलिव्हरी चलनाद्वारे होऊ शकणार होते. एकतर डिलिव्हरी चलन कायदेशीर दस्तऐवज नाही आणि बँकेत कागदपत्र पोहोचण्या अगोदरच ग्राहकाला माल मिळणार होता. पण खातेदाराने अशी विनंती केली की ट्रान्सपोर्ट रिसीटच्या ऐवजी डिलिव्हरी चलन विक्रेत्याने द्यावे अशी शर्त टाकावी. माल अगोदरच मिळणार असल्यामुळे, स्वीकृत डिलिव्हरी चलन (Accepted Delivery Challan) मागावे. पण जर पुढे ग्राहकाने हुंडी स्वीकृत नाही केली तर काय? ग्राहकाने लेखी हमी दिली की तो बँकेत डॉक्युमेंट आल्यावर तो हुंडी स्वीकृत करेल. कुठलाही दोष काढणार नाही . परंतु अशा प्रकारची एल.सी. उघडणे शाखेच्या अधिकारात बसत नव्हते. आम्ही मामला आमच्या महाप्रबंधकांकडे पाठवला. महाप्रबंधकांनी खातेदार आणि शाखा प्रतिनिधी-मी यांची त्यांच्या केबिनमध्ये मीटिंग आयोजित केली. तिथे महाप्रबंधक यांच्या कार्यालयातील मुख्य प्रबंधक आणि प्रबंधक उपस्थित होते. या मीटिंगमध्ये चर्चा होऊन, महाप्रबंधकांनी अशी एल.सी. उघडायला परवानगी, तोंडी संमती दिली. मी लेखी संमती काही घेतली नव्हती. मग अशा प्रकारे वेगवेगळ्या रकमेच्या एल. सी. एक कोटीपर्यंत उघडण्यात आल्या . खातेदाराला माल मिळाला. त्याने ९० दिवसांच्या हुंडी स्वीकृत (Accept) ही केल्या. पण देय तारखेला खातेदाराने काही पैसे भरले नाहीत. पण बँकेला मात्र विक्रेत्याला, एल. सी. च्या शर्ती नुसार पैसे देणे भाग होते आणि आता शाखेवर हे पैसे खातेदाराकडून वसूल करण्याची जबाबदारी येऊन पडली. पाठपुरावा करून सुद्धा खातेदार पैसे देईना. खाते N.P. झाले. रक्कम मोठी असल्यामुळेही गोष्ट षट्कर्णी झाली. आमच्या महाप्रबंधकांच्या विरोधी गटाने लगेच शाखेचे स्पेशल ऑडिट लावले. ऑडिटरने खालील गोष्टी रिपोर्ट केल्या.

१) शाखेने डिलिव्हरी चलनची एल. सी. वरिष्ठांच्या संमतीशि वाय उघडली कारण लेखी संमती रेकॉर्डवर नव्हती २) सुरुवातीच्या व्यवहारातच खाते N. P. ! सबब शिफारस करताना शाखेने हलगर्जीपणा केला, नीट चौकशी केली नाही. आता, एक तर डिलिव्हरी चलनाची एल.सी उघडण्याबद्दल वरिष्ठांकडून पूर्वलक्षी प्रभावाने लिखित संमती मिळवणे ही तांत्रिक बाब आणि पैसे वसूल करणे ही दुसरी बाब अंगावर येऊन पडली.

मी प्रथम महाप्रबंधकांच्या कार्यालयातील प्रबंधकांना फोन केला, जो माझ्याच दर्जाचा होता. तो उपरोक्त झालेल्या मीटिंगला, ज्यामध्ये महाप्रबंधकांनी अशी एल. सी. उघडायची संमती दिली होती, त्यात हजर होता. मी त्याच्याकडे लेखी संमती मागितली. त्याने सांगितले, आता या गोष्टीला बराच काळ लोटला आहे आणि खातेपण N.P. झाले आहे. सबब अशी संमती त्याला महाप्रबंधकांकडून मिळवता येणार नाही. Sorry ! त्याला हे मान्य होते की अशी परवानगी दिली आहे, पण तो आता काही ती लिखित स्वरूपात मिळवणार नाही. माझी बोलतीच बंद झाली !

दुसरीकडे खातेदार दाद देत नव्हता. ना तो फोन उचलायचा, ना त्याच्या ऑफिसमध्ये भेटायचा, ना शाखेवर यायचा. जणूकाही तो अंतर्धानच पावला होता! एक दिवस मी निश्चय केला की आज कसेही करून त्याला गाठायचेच, मग शेंडी तुटो किंवा पारंबी. आता त्याचा आणि माझा पाठशिवणीचा खेळ सुरु केला. मी प्रथम शेजारच्या त्याच्या ऑफिसमध्ये गेलो तर कळले की तो शहरातल्या त्याच्या दुसऱ्या ऑफिसला गेलाय. तेथे गेल्यावर समजले की त्याच्या उपनगराच्या ऑफिसला गेला आहे. तेथे सांगण्यात

आले की तो बाहेर गेला आहे आणि त्यानंतर तो थेट रात्री उशीरापर्यंत घरीच जाणार आहे. त्याचे घर शहराच्या बाहेरच्या भागात होते. जवळपास लोकलने एक तास दूर. मी मग तिथे गेलो. तेव्हा समजले की त्याने पत्ता बदललेला आहे आणि तो रेल्वेस्टेशनच्या दुसऱ्या बाजूला रहातो.

नवीन रहिवाश्याला त्याचा सध्याचा पत्ता माहित नव्हता. त्याच्याकडून त्याच बिल्डिंगमध्ये रहाणाऱ्या खातेदाराच्या एका नातेवाईकाचा ठावठिकाणा लागला. त्याने नवीन पत्ता दिला. तेथे प्रयाण केले. मुसळधार पाऊस पडत होता. वीज गायब आणि रस्त्यावर पूर्ण अंधार होता. रिक्षा मिळत नव्हती. चालत चालत जायला लागलो. वाटेत एका खड्ड्यात पडलो. चिखलाने बरबटलो. मग पावसाच्या पाण्यातच स्वतःला स्वच्छ केले आणि वाटचाल चालू ठेवली. शेवटी नवीन पत्त्यावर पोहोचलो तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते. एकंदरीत माझी ओलीचिंब अवस्था आणि थोडाफार चिखल इकडे तिकडे लागलेला असे बघून बिल्डिंगच्या रखवालदाराने मला प्रवेश द्यायला नकार दिला. आता काय करायचे? मोठी पंचाईत झाली.

सोसाट्याचा वारा आणि पावसात नखशिखांत भिजल्यामुळे मी थंडीने कुडकुडत होतो. तिथे समोर एक चहाची टपरी होती. चहा प्यायचे ठरवले. चहा पितापिता कळले की चहावाला आणि रखवालदार एकाच गावचे आहेत. मी चहावाल्याला विनंती केली की त्याने, रखवालदाराला सांगून, मला बिल्डिंग मध्ये प्रवेश द्यावा कारण मी फ्लॅटवाल्याच्या गावातून आलो आहे आणि मला त्याला एक तातडीचा निरोप द्यायचा आहे. रखवालदाराची समज पटली, बिल्डिंगमध्ये प्रवेश मिळाला, फ्लॅटवर गेलो, बेल वाजवली, दरवाजा उघडला आणि फ्लॅटची एकंदरीत अवस्था बघून माळा धक्काच बसला.

एक कोटी कर्ज देण्याची खातेदाराची नक्कीच ऐपत दिसत नव्हती. खातेदार अजून घरी आला नव्हता. त्याच्या बायकोकडे एक पत्र लिहून दिले. माझी पाठलागाची सर्व हकीकत लिहिली. असेही लिहिले की, मी फक्त बँकेने दिलेले कर्जच परत मागत आहे. तर ते परत करावे. खातेदार सी.ए. होता. हे स्पष्ट केले की पैसे न मिळाल्यास नाईलाजाने आम्हाला त्याच्या सी.ए. च्या संस्थेला लिहावे लागेल आणि परिणामतः त्याची सनद रद्द होईल. पत्र देऊन मी रात्री बारा वाजता घरी पोहोचलो.

या पाठपुराव्याचा चांगलाच परिणाम झाला. दुसऱ्या दिवशी खातेदार बँकेत आला. त्याने मला झालेल्या त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त केली आणि हप्त्याहप्त्याने पैसे द्यायचे मान्य केले आणि तसे पत्रही दिले. लगेचच मी थेट आमच्या महाप्रबंधकांकडे गेलो. त्यांना माझी सगळी पाठपुराव्याची हकीकत सांगितली. हेही सांगितले की टप्प्याटप्प्याने खातेदार सगळे पैसे व्याजासकट देणार आहे आणि त्याने तसे पत्रही दिले आहे.

शेवटी साहेबांना मी डिलिव्हरी चलन घेऊन एल. सी. उघडली त्याची लेखी परवानगी मागितली आणि ती नसल्यामुळे मला कसा त्रास होत आहे हेही सांगितले. ते म्हणाले, काही काळजी करू नकोस. या एल.सी.मध्ये खातेदाराने हुंडी स्वीकृत केल्यावर आपण त्याला ट्रांसपोर्ट डॉक्युमेंट दिले असते आणि त्याला माल मिळालाच असता. तुझ्या एल. सी. मध्ये फक्त माल आधी मिळाला पण स्वीकृत हुंडी बँकेत आहे आणि पैसे द्यायला खातेदार कायदेशीर बांधील आहे. तू पत्र पाठव. मी लगेचच पूर्वलक्षी प्रभावाने लेखी संमती देईन. पत्र माझ्याकडे थेट पाठव. शिवाय खातेदाराने पैसे देण्याचे लिहून दिले आहे. खातेदाराची तेवढी ऐपत नाही हे मला माहित आहे. पण आपण, खातेदार ज्या उद्योग समूहाचा हिस्सा आहे त्या उद्योग समूहाच्या मालकाची लेखी हमी घेऊया. तो मोठा तालेवार आणि प्रतिष्ठित माणूस आहे म्हणजे लोन कसे दिले गेले हे म्हणणाऱ्यांची तोंडे बंद होतील. तू फक्त नियमित पाठपुरावा कर, पूर्ण पैसे वसूल होईपर्यंत. अर्थात मी नियमित पाठपुरावा चालूच ठेवला. खाते यथावकाश बंद झाले आणि प्रकरण संपले !

या प्रकरणातून मला वाचकांना एवढेच सांगायचे आहे, कष्टात कसूर करू नका, प्रयत्नांती परमेश्वर !


शब्दांकन : **श्रीकांत शिंत्रे, सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**
मोबा. ९९२००५८७०५

# मुलांचे पान




## » चित्र रंगवा


| | |
|---|---|
| 1 red | 2 yellow |
| 3 green | 4 blue |
| 5 brown | 6 black |



## ≫ फरक ओळखा



## ≫ ठिपके जोडून चित्र तयार करा



### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक बत्तीसावा)

'उद्या आपल्याला दादा शिष्य करून घेणार...! आपल्याला ज्ञान मिळण्याचा मार्ग दिसणार. गीता, वेद, उपनिषदं हे सारं आपल्याला पाठ आहे; पण त्यातील तत्त्वार्थ आणि अन्वयार्थ यांची ओळख आपल्याला होणार,' या आनंदात निजलेल्या सोपानाला अगदी मध्यरात्रीच जाग आली. रात्रीचा दुसरा प्रहर संपत आला होता. सोपान आपल्या अंथरुणावर उठून बसला. देवासमोर समई शांतपणे तेवत होती. तिचा अंधूक प्रकाश झोपडीत एक गूढ वातावरण निर्माण करत होता. सोपान झोपडीचं कवाड लोटून बाहेर आला. आकाश निरभ्र होतं. चंद्राची अर्धी कोर पूर्ण तेजानं प्रकाशीत होती. डोणीतल्या पाण्यानं त्यानं आंघोळ केली आणि तशाच ओलेत्या वस्त्रानं तो पद्मासन घालून तुळशी वृंदावनाजवळ बसला. एकवार श्रीकृष्णाचं स्मरण करून त्याने ओंकारसाधनेला सुरुवात केली. हळूहळू त्याचा स्वर, त्याचा आकार, शुद्ध होत चालला. एकेक ओंकार नाभीतून निघून मस्तकापर्यंत भिनत चालला. त्या ओंकारानं मग ती झोपडी व्यापली. झोपडीभवतालचा परिसरही व्यापला. ओंकारसाधना आता अधिक गहिरी झाली. अधिक शुद्ध होऊ लागली. त्या ओंकाराला आता एक विशिष्ट लय आली. ताल आला. त्या ओंकाराची स्पंदनं आवर्तात फिरू लागली. एकेक आवर्तन अधिकाधिक गहिरं, अधिक खोल, अधिक सर्जनशील होत गेलं, त्या स्पंदनांनी अवघ्या वातावरणात एक कंप निर्माण केला. त्या ध्वनिलहरींत चराचराला अस्थिर करण्याचं सामर्थ्य होतं. त्या ध्वनिलहरींच्या स्पंदनांतून आवर्तनांची एक मालिकाच तयार झाली आणि अवघ्या सृष्टीला जाग आली. सर्वप्रथम जाग आली निवृत्तीला. सभोवती निर्माण झालेल्या या स्पंदनांची जाणीव त्याला झाली. त्या ध्वनिलहरींनी निर्माण केलेली कंपनं अंथरुणावर उठून बसलेल्या ठिकाणीही त्याला जाणवत होती. त्याचं जाणिवेनं जागा झाला ज्ञानेश्वर. आपल्या अंगाखालची जमीन कंप पावते आहे, असं त्याला वाटलं. तो ताडकन उठून बसला. ध्वनिकंपनांची ही चाहूल मुक्तालाही लागली आणि अंथरूणावर डोळे चोळत तीही उठून बसली.

निवृत्तीने पाहिलं, सोपान अंथरुणावर नव्हता. अजून बरीच रात्र शिल्लक होती. अजून चांदण्या लुकलुकत होत्या. चंद्र अजून आकाशाच्या मध्यावर होता. झोपडीच्या छतातून त्याचे किरण कवडशांचे रूप घेऊन खाली उतरत होते. झोपडीतल्या सारवलेल्या जमिनीवर त्या किरणांचे गोल-गोल वर्तुळाकार उमटले होते; पण हे सगळं पाहण्याची ही वेळ नव्हती. सोपान अंथरूणावर दिसत नव्हता. 'मग तो गेला कुठे? आणि चराचराला पुरून उरलेला हा ध्वनी कसला? अवघ्या सृष्टीला वेढून टाकणारी ही स्पंदनं कसली? अवघ्या अवकाशात भरून राहिलेल्या या ध्वनिलहरी कुठून आल्या? यांचं उगमस्थान काय? आणि ही कंप पावणारी जमीन, प्रतिध्वनीनं गुंजणारं क्षितिज कोणता संकेत देत होतं? काय सुचवायचं होतं या चराचराला? आणि या सगळ्यांपेक्षा सोपान कुठं आहे?' निवृत्ती-ज्ञानेशाच्या मनात प्रश्नांची मालिकाच तयार होत होती; पण उत्तर एकाचंही नव्हतं. 'खरचं! एवढ्या उत्तररात्री हा कुठे गेला असेल? गंगेच्या घाटावर तर नसेल? वाळवंटात तर जाऊन बसला नसेल? किंवा औदुंबराखाली?' छे:! काही सुचत नव्हतं. त्यातल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर नकारार्थीच येत होतं.

'मग हा सोपान गेला कुठं! स्वभावानं काहीसा शांत, अबोल वाटणारा, सतत आपल्याच विचारात, कसल्या न कसल्यातरी चिंतनात मग्न असणारा सोपान

तसा मनस्वीही होता. कधीकधी त्याचा हा मनस्वीपणा त्याच्यातल्या समंजसपणावर मात करत असे. याचं प्रत्यंतर त्यानं दशक्रिया विधीच्या वेळी हविर्भाग घेण्यासाठी प्रत्यक्ष आई-बाबांना बोलावून आणलं, तेव्हा आलं होतं. आता हा कुठे गेला असेल?' निवृत्ती-ज्ञानेश्वर विचार करत होते. आणि ओंकारध्वनी? तो तर आणखीनच निनादत होता. आता जणू त्याची व्याप्ती वाढली होती. पृथ्वी पादाक्रांत करून धरेला आपल्या ध्वनिस्पंदनात सामावून घेऊन तो ओंकार ध्वनी आता स्वर्ग आणि पाताळ यांना आपल्यात विरघळून टाकण्यासाठी सज्ज झाला होता. जणू त्रैलोक्याला आपल्या बाहूत भरण्याचं सामर्थ्य त्याच्यात होतं. निवृत्ती लक्षपूर्वक ऐकू लागला. त्या ओंकाराचा उच्चार गगनवेधी होता. त्याची दीर्घता क्षितिजापर्यंत होती. षड्जापासून सुरुवात करून पुन्हा तो ओंकार बाराही स्वरांनंतर मध्य सप्तकातल्या षड्जापर्यंत येऊन पोहोचत होता. तिथून मध्य सप्तकातल्या बारा स्वरांना घेऊन तो तार सप्तकापर्यंत निनादात होता. तार सप्तकातल्या बारा पायऱ्यांवरून ओघळत तो ओंकार पुन्हा मंद्र षड्जापर्यंत पोहोचत होता.

अशा प्रकारे मंद्र षड्ज ते तार षड्ज ते पुन्हा मंद्र षड्ज अशा आवर्तनात फिरताना बहात्तर ओंकारांची पल्लेदार स्वरसाधना होत होती. प्रत्येक ओंकार अचूक आणि नेमका होता. सुस्पष्ट होता. स्वरसंकोचाला थारा नव्हता आणि अतिक्रमणाचा मोहही नव्हता ! अतिशुद्ध अशा त्या ओंकारात सहस्त्र रश्मीचं तेज होतं, चंद्राची शीतलता होती, मोरपिसाची थरथर होती, शेषाची अविचलता होती, गोरसाची माधुरी होती, अमृताचं पावित्र्य होतं, आकाशगामी नाद होता, उदधीची गाज होती, प्रत्ययकारी आवर्त होतं. विश्वाचं आर्त होतं ! तो ओंकार लक्षपूर्वक ऐकत असता निवृत्तीला एक क्षणभर, अगदी क्षणभर तो आवाज ओळखीचा वाटला. तो श्वास ओळखीचा वाटला. क्षणभरच ! पण तेवढ्या क्षणानंही निवृत्तीला चकित केले. तो आवाज, तो स्वर, तो श्वास ओळखीचा, अगदी ओळखीचा, अगदी जवळचा, आपल्या काळजातला आहे आणि तो ओंकार स्वरसाधनेचा शुद्ध स्वर आपल्या सोपानाचा आहे, हे निवृत्तीच्या लक्षात आलं. त्याच वेळी ते ज्ञानेशाच्याही लक्षात आलं आणि दोघंही जण अंतर्बाह्य थरारले ! 'नऊ-दहा वर्षांच्या सोपानानं इतकी शुद्ध ओंकारसाधना करावी? छे:! एवढ्या लहान वयात इतका शुद्ध ओंकार? त्याची स्पंदनता एवढी तीव्र, की अवघी सृष्टी कंपायमान व्हवी?' मनाला पटत नव्हतं, पण कानावर विश्वास ठेवणं भाग होतं. दोघंही एकाच वेळी झोपडीच्या दाराकडे धावले. कवाड नुसतं ओढून घेतलं होतं. त्यांच्या पाठोपाठ मुक्ता धावली. तिघंही झोपडी बाहेर आली. बाहेरचं वातावरण प्रचंड अल्हादायक होतं. अवकाशात विरघळलेल्या चंद्राच्या प्रकाशाबरोबरच एक मंद सुगंधही दरवळत होता. जणू तो चंद्रकिरणांसमवेतच पृथ्वीवर आला होता आणि वातावरणात विरघळून गेला होता. ओंकाराचा स्वर मात्र या साऱ्याला छेदत वातावरणात लहरी उत्पन्न करत होता. आवाजाच्या रोखानं तिघांचीही पावलं पडू लागली. अंगणातलं तुळशीवृंदावन आणि तुळशीवृंदावनापलीकडून तो स्वर येत होता. त्या निनादणाऱ्या स्वराचा उगम त्या वृंदावनापलीकडे होता. तिघंही त्वरेनं तिथं पोहोचली आणि त्या तिघांनी, त्या तिघांच्या दोन दुणे सहा नेत्रांनी जे पाहिलं, ते खरोखर अविस्मरणीय होतं ! अलौकिक होतं ! अपूर्व होतं !

तुळशीवृंदावनापलीकडे पद्मासन घालून सोपान बसला होता. त्यानं नेसलेल्या पंचावरून ते उद्धृत होत होतं. ओंकारसाधना तोच करत होता; पण हे सगळं असूनही समोर बसलेला सोपान नव्हताच. तिथं कुणीतरी वेगळ्याच रूपात बसलं होतं. त्या रूपाला चार मुखं होती. चारही चेहरे चार बाजूंकडे तोंड केलेले होते. चारही मुखं अत्यंत तेजस्वी, दिव्य प्रभा असलेली अशी होती. चारही मुखांच्या मस्तकावर शोभायमान किरीट होता. कपाळावर अशा आकाराचे ओंकार सदृश्य गंध त्यास दिव्य प्रभेची शोभा वाढवत होते. त्या रूपाला चार

हात होते. एका हातात ऋग्वेद, दुसऱ्या हातात स्रुवा (यज्ञात तूप घालण्याची लांब पळी) होती. कमळावर पद्मासन घालून ते दिव्य रूप आसनस्थ झालं होतं. त्या दिव्य रूपाचे डोळे अत्यंत तेजस्वी, पण स्निग्धतेने भरलेले, स्नेहार्द होते ! पांढरीशुभ्र दाढी त्या दिव्यमुखावर होती आणि ती छातीवर रुळत होती. आपल्यासमोर सोपान नसून दुसरंच कुणीतरी तेजस्वी रूपडं बसलं आहे; अत्यंत तेजस्वी, अत्यंत प्रभावशाली, ऋषितुल्य असं! निवृत्तीच्या हे लक्षात आलं आणि तात्काळ त्याला बोध झाला, हे तर 'जगत्पिता ब्रह्मदेव!' सृष्टीची उत्पत्ती ज्यांनी केली, या विश्वाचं पालकत्व ज्यांच्याकडे जातं ते 'जगत्पिता ब्रह्मदेव!' ब्रह्मदेव इथं आहेत मग सोपान? निवृत्ती-ज्ञानेश्वर एकमेकांकडे पाहू लागले. त्यांच्या नजरेत प्रश्न होता आणि आश्चर्यही! मुक्तानं घाबरून निवृत्तीचा हात धरला. निवृत्ती-ज्ञानेशाची नजरानजर झाली आणि दोघांही एकाच वेळी त्या विश्वकर्त्याला हात जोडले. मुक्तानंही त्याचं अनुकरण केलं. मस्तक झुकवून, हात जोडून, डोळे मिटून तिघं क्षणभर अविचल स्तब्ध उभे राहिले. जणू त्या ब्रह्मदेवाच्या दर्शनानं त्यांचं भान हरपलं होतं !

आता डोळे उघडून पुन्हा एकवार ब्रह्मदेवाचं दर्शन घ्यावं, असा विचार करताहेत, तोच त्यांना सोपानाचा आवाज ऐकायला आला, ''निवृत्तीदादा, ज्ञानादादा, दोघं हे काय करताय? मला कशाला वंदन करताय? अरे, मी तुमच्यापेक्षा लहान आहे. निवृत्तीदादा, अरे मीच तुम्हा दोघांना वंदन करायला हवं! निवृत्तीदादा, खरंतर तू माझा मोठा भाऊ; पण आई-बाबा गेल्यापासून तूच आई झालास आणि बाबाही! आणि आज तर मी तुझा शिष्य होणार आणि तू माझा गुरू ! दादा, मी किती भाग्यवान आहे, की मला आई-वडिलांच्या ठिकाणी असलेला मोठा भाऊ गुरू म्हणून लाभला. दादा, 'मातृदेवो भव। पितृदेवो भव। आणि आचार्य देवो भव।' अशी तीन श्रद्धास्थानं मला एकाच वेळी, एकाच ठिकाणी गवसली ! दादा, मी कृतार्थ आहे!'' सोपानाचं बोलणं ऐकून निवृत्ती-ज्ञानेश्वर भानावर आले. 'अरे! हा तर आपला सोपान! मग ब्रह्मदेव कुठे गेले? की सोपान हाच ब्रह्मदेव आहे?' निवृत्तीच्या मनात प्रश्न उभा राहिला आणि त्या प्रश्नाचं उत्तरही त्याला 'होय' असं मिळालं.

त्रिपुरारी पौर्णिमेला जन्मलेला हा सोपान साक्षात ब्रह्मदेवाचं रूप होता आणि प्रत्यक्ष ब्रह्मदेवानं साक्षात आपलं रूप दाखवून याची प्रचिती दिली होती. अभावितपणे निवृत्तीनं सोपानाला जवळ घेतलं. धाकटा भाऊ म्हणून वाटणारी माया, पुत्रवत सांभाळतो आहोत म्हणून वाटणारे प्रेम, शिष्य होणार म्हणून होणारा आनंद, निवृत्तीच्या मनातल्या या भावना सोपानाच्या दिसलेल्या या ब्रह्मरूपानं त्या शतगुणित झाल्या. ज्ञानेश्वरासारखा शिष्य मिळाला म्हणून आपण धन्यता मानत होतो; पण सोपानासारखा शिष्य मिळून आपण कृतार्थ होणार आहोत, ही भावना निवृत्तीच्या मनात निर्माण झाली आणि त्याच्याही नकळत, अगदी नकळतपणे सोपानाभोवतालची त्याची मिठी घट्ट झाली. अधिक घट्ट झाली !

(क्रमशः)

**- सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००


## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे - 8275606627,**

**श्री. रोहित गवळी - 9657963475**

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ५ : कर्म संन्यास योग**

**योगी कर्म करूनिया म्हणती नाही । देखणे ऐकणे स्वरूप पाही । गंध भोजन न मने निद्रा काही । श्वास टाकणे आठ ही कर्मे ।।**
न कांहीं मी करीं ऐसें योगी तत्व-ज्ञ जाणुनी ।
देखे ऐके शिवे हुंगे खाय जाय निजे श्वसे ।।८।।

**बोलणे आणि घेणे देणे । पातया पाते लावणे उघटणे। हा इंद्रियांचा व्यापार इंद्रिया कारणें । कोणास संबंध नाही ।।**
बोले सोडी धरी किंवा पापणी हालवी जरी ।
इंद्रियें आपुल्या अर्थीं वागती हें चि पाहतो ।।९।।

**ब्रह्मार्पण कर्म करी । मग त्यजुनी असे निर्धारी । पापे न लिंपे तो ऐसिया परी । पद्मपत्री उदक जैसें ।।**
ब्रह्मीं ठेवूनियां कर्में संग सोडूनि जो करी ।
पापें न लिप्त तो होय पद्म-पत्र जसें जळें ।।१०।।

**काया इंद्रिय मन बुद्धि । योग कर्म करिती कैवल्यसिद्धि। त्यांचा संग त्यजुनी आधी । आत्माचि होय ।।**
देहा-मनानें बुद्धीनें इंद्रियांनीं हि केवळ ।
आत्म-शुद्धर्थ नि:संग योगी कर्म अनुष्ठिती ।।११।।

**योगी कर्मफलाची इच्छा त्यजुनी । तो शांतिनिष्ठ पावे मनी । कामनेस्तव आयुक्त कर्म आचरोनी । याने अशक्त होउनि बाधिजेल ।।**
युक्त तो फळ सोडूनि शांति निश्चळ पावतो ।
अयुक्त स्वैर-वृत्तीनें फळीं आसक्त बांधिला ।।१२।।

**सर्व कर्म मनांपासुनी न्यासी । तो सुख पावे संन्यासी। असतां नवद्वारे देहासी । करिता ना करविता ।।**
मनानें सगळीं कर्में सोडुनी संयमी सुखें ।
नव-द्वार-पुरीं राहे करी ना करवी हि ना ।।१३।।

**कर्तुत्व आणि कर्म करणें । कर्माचे फल भोग भोगणे । हे परमात्मयापासोनी नाहीं होणें । जाण स्वभावे लोक वर्ततसे ।।**
न कर्तेपण लोकांचें न कर्मे निर्मितो प्रभु ।
न कर्मीं फल-संयोग स्वभावें सर्व होतसे ।।१४।।

**पाप पुण्य न लिंपे आपण । ज्ञान झाकोळलें अज्ञाने करून । प्राणी बांधले मोहें जाण । सर्वही जीव देखा।।**
न घे पाप हि कोणाचें न वा पुण्य हि तो विभु ।
अज्ञानें झांकिलें ज्ञान त्यामुळें जीव मोहित ।।१५।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# दोन हजाराचा धडा

पैसे हरवू नयेत म्हणून अधिकचे पैसे पंतानी विजारीच्या (Pant) चोर खिशात ठेवले. त्यांचा चोरखिसा विजारीच्या कंबरपट्ट्याला लागूनच आतल्याबाजूला असतो. त्यामुळे पैसे, विजार घातली की कमरेपाशी एकदम सुरक्षित राहतात.

पैसे चोरी होवू नयेत म्हणून ज्या खिशात ठेवले जातात त्या खिशाला चोर खिसा असे म्हणतात ! आहे कि नाही गम्मत ! पण ह्याचं खरं कारण असावं हा खिसा चोरासारखा कुठे आहे ते कोणाला कळत नाही, कोणाचा तेथे हातच काय नजरदेखील जाउ शकत नाही, अशा ठिकाणी तो असतो म्हणून याला चोरखिसा असे म्हटले जाते.

तर... अशा या खिशात ठेवलेले पैसे चोरी कसे होतील? पण ती चोरी झाली ! पैसे अगदी चोर खिशातूनच चोरले गेले ते सुद्धा पंतांच्या नकळत. याला जबाबदार पंतच. प्रवासाहून आलं की बाहेरचे कपडे काढून ठेवायची पद्धत असते पण खिसे कांही सहसा मोकळे केले जात नाहीत. ते कुणी आणि कधी मोकळे करायचे हा पंतांच्याकडे वादाचा मुद्दा असतो.

कपडे धुवायची हौस ज्याला त्याने कपडे धुवायला टाकण्यापूर्वी सर्व खिसे तपासावेत असे पंतांचे म्हणणे असते आणि इथेच वादाला तोंड फुटते.

''हो, तेव्हढेच काम आहे का मला? तुमचे खिसे आणि त्यातील अनेक चिठ्या चपाटया आणि पैसे तुम्हाला काढता येत नाहीत? त्यासाठी कपडे धुवायची वाट कशाला बघायची? एक काम स्वत:चे स्वत: करायला नको.'' पंतीणीचा सात्विक संताप उफाळून वर येतो.

''तू माझ्या कपड्यांना हात लावतच जावू नको बघू.'' असं पंतानी म्हणायचा अवकाश आगीत तेल पडलंच म्हणून समजा !

या पंत आणि पंतीच्या गरम संवादामध्ये न पडता त्यादिवशी चोरखिशाने अंग चोरून घेतले आणि तो कपडे धुणे, वाळत घालणे, इस्त्रीला देणे या सर्व क्रियातून आणि ही कामे करणाऱ्या व्यक्तींच्या नजरेतून बेमालूम पणे सुटला ते सुद्धा मुद्येमालासकट!

-*--*-

इस्त्रीवाला शर्मा पंताना बँकेच्या बाहेर भेटला. नेहमी तो हसून ओळख दाखवायचा पण आज तो आपणहून पंतांशी बोलायला आला.

'साहब, आप का कुछ खोया है क्या?' पंत संभ्रमावस्थेत. 'क्यू? क्या हुवा?'

'आपके पतलून (Pant) से पैसा मिला !' पंत आश्चर्यचकित ! 'दो हज्जार रुपया !'

पंताना पुन्हा एकदा धक्का बसला, पण ह्या खेपेचा धक्का सुखद होता.

'मेरे आदमी को इस्त्री करते समय पतलुनके चोरखिसेमे मिला. हमारे आदमी को पैसा निकालते हुए मैने देखा. आदमी नया है. मुझे, उसे आजमाना है. आप जाके उसे पैसा मांगो.'

शर्माजीला पंतांच्यातर्फे नव्या नोकराला तपासायचे होते. पंत तरी नाही कसे म्हणणार? दोन हजारांचा, ते सुद्धा त्यांच्या दोन हजारांचा प्रश्न होता.

पंत इस्त्रीचे कपडे घ्यायला दुकानात गेले. त्यांना बघून नोकराने लगेच कपड्याने भरलेली पिशवी बाहेर काढली.

'बारा कपडे थे.'

'नही, ग्यारा थे.'

दोन हजर रुपये मिळणार, तेंव्हा एक कपडा गेला तरी काय हरकत आहे? असा विचार करून पंतानी पिशवी घेतली. खिशातून शंभराची नोट काढली. ती देताना त्यांनी माणसाला सहज विचारले, 'इस्त्री करते समय पैसा मिला क्या? दो हजार रुपया था.'

'नाही तो...' माणसाने ठामपणे सांगितले.

'ग्यारा कपडे का एकसो दस हुंवा ना? ये लो दस रुपया' असं म्हणत पंतानी दहाची नोट पुढे केली.

'रहेने दो...' भय्याने दोन हजारांचे एहेसान पंतांवर फेकले.

पैसे गेल्यात जमा करून पंत परतले.

पैसे गेलेत हे माहीतच नव्हते, त्यामुळे दु:ख नव्हते. पण आता समजले त्यामुळे पंतांच्या जीवाला चुटपूट लागली. शिवाय सांगणार कोणाला? चूक त्यांचीच होती. विजार धुवायला टाकायच्या आधी खिशातील पैसे काढायला हवे होते.

-✻--✻-

दोन दिवसानंतर असाच शर्मा पंताना समोरा आला. 'दिया क्या पैसा?'

'नही तो. पैसा मिला नही ऐसा बोला वो.'

'साला, बदमाश है? क्या करू साहब? आजकाल आदमी नाही मिलते. धंदा तो बहोत है... ऐसे ही आदमीसे काम चलाना पडता है. खामखा आपका पैसा गया.'

एक लांब उसासा सोडून पंत म्हणाले, 'चलो ठीक है.''

'लेकीन साहब आपका पैसा तो मुझे दिलवाना है.. मै कोशिश करुंगा, उस हरामिसे पैसे निकलवाने की, मगर बहोत मुश्कील है.' शर्माने त्याची असमर्थता दर्शवली पण त्याला ग्राहकाचे नुकसान झाले हे सहन होत नव्हते हे त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होते.

पंत आणि शर्मा आपापल्या दिशांना परतले. थोड्या वेळाने शर्मा परत फिरला.

'साहबजी रुको...' त्याने पंताना हाक मारली.

'एक काम करते. आप हमे इस्त्रिका पैसे मत देना... दुई हजार होने तक... हिसाब आपही रखना. शर्माच्या चेहऱ्यावर ऋणमुक्तीचा उपाय सापडल्याचे भाव होते.

शर्माच्या ह्या पर्यायाचे पंताना आश्चर्य तर वाटलेच पण त्याच बरोबर शर्माचे कौतुकही वाटले.

दूरदेशीची ही मंडळी व्यवसायात का यशस्वी होतात याचे एक महत्वाचे कारण पंताना समजले. त्याचप्रमाणे दूरदेशीचा हा भय्या इथे येऊन धंदा करतोय. त्याचा व्यवसाय का चालतो ह्याचे पंताना उत्तर मिळाले.

-✻--✻-

आजकाल शर्माच पंतांकडून इस्त्रीचे कपडे घेऊन जातो आणि आणूनही देतो. नेताना खिसेही तपासतो.

पंतांनी हिशोबासाठी वही घातली आहे पण वहीचे पान अजून कोरेच आहे.

त्यांच्या हिशोबात मात्र इस्त्रीचे पैसे दिल्याचे नमूद केलेले असते.

शर्माने ग्राहकांचे पैसे खाणारा भय्या बदलला. त्याला दुसरा माणूस मिळाला.

आजकाल पंत बिनखिश्यांचेच कपडे घालणे पसंत करतात.

दोन हजार रुपयात बरेच कांही साध्य झाले .

**– कौस्तुभ ताम्हनकर**

मोबा. ९८१९७४५३९३

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**



# अनिता अशोक राजमाने हिचे सुयश !

फ्रांसच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ विद्यापीठाला अंतराळ क्षेत्रातील संशोधनासाठी संपूर्ण जगातून एकाच विद्यार्थिनीला १४ लाखाची शिष्यवृत्ती द्यायची होती. कोल्हापूरातील हातकणंगले हलोंडी गावच्या कु. अनिशा अशोक राजमाने हिची उत्कृष्ट प्रबंध लिहिला म्हणून निवड केली. येत्या जूनमध्ये अनिशा दोन महिन्यांसाठी अंतराळ क्षेत्रात संशोधन करण्यासाठी नेदरलँडला जाणार आहे.

एकेकाळी कोल्हापूर प्रसिद्ध होतं ते कुस्तीसाठी. त्यानंतर वीरधवल खाडेने जलतरण क्षेत्रात कोल्हापूरचं नाव गेली काही वर्षे दुमदुमत ठेवलंय. देशात सर्वात जास्त मर्सिडीज कार खरेदी करणारे कोल्हापूरकर आहेत ही आणखी मोठी कोल्हापूरची ओळख हल्लीच्या वर्षात झालीय. अशा वेळी कोल्हापूर बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात तर अंतराळ भरारी घेणारं ठरलंय ते अनिशा राजमानेमुळे ! एका शेतकऱ्याची मुलगी असलेली अनिशा केवळ कल्पना चावलाच्या कर्तृत्वाने भारावून जाते आणि अंतराळ क्षेत्रात अभ्यास करायला कोणत्याही सोयी सुविधा नसताना त्या क्षेत्राचा अभ्यास करते आणि फ्रांसतर्फे दिली जाणारी कल्पना चावला शिष्यवृत्ती मिळवते ही असामान्य घटना म्हणायला हवी ! अनिशाने प्रोडक्शन इंजिनिअरिंग केलंय. आता ती सायबर कॉलेजमधून एमबीए करतेय. नासामधून पुढील प्रशिक्षण घेऊन आपल्या देशात अंतराळ संशोधन करायचं अनिशाचं स्वप्नं आहे.

अनिशा राजमानेची ही कहाणी महाराष्ट्रातील लाखो मुलींना नक्कीच प्रेरणा देणारी आहे. दुर्दैवाने मीडिया अशा बुद्धिमान मुलींना प्रसिद्धी देत नाही, त्यामुळे लाखो मुलींना तिच्या कर्तृत्वाची माहिती मिळत नाही. अडचणींवर मात करून मराठी पताका अटकेपार रोवणाऱ्या अनिशा राजमानेचं म्हणूनच खूप खूप अभिनंदन !

प्रत्येकाला एक तरी मुलगी हवीच– अनिशा राजमानेसारखी !

**– संजीव पेडणेकर**

# साहित्यिकांची टोपण नावे

४१. धुंडिराज – मो. ग. रांगणेकर
४२. नागेश – नागेश गणेश नवरे
४३. नाथमाधव – द्वारकानाथ माधवराव पिटके
४४. निशिगंध – रा. श्री. जोग
४५. नृसिंहाग्रज – ल. गो. जोशी
४६. पद्मा – पद्मा विष्णू गोळे
४७. पराशर – लक्ष्मणराव सरदेसाई
४८. पी. सावळाराम – निवृत्ती रावजी पाटील
४९. पुष्पदंत – प्र. न. जोशी
५०. प्रफुल्लदत्त – दत्तात्रय विष्णू तेंडोलकर
५१. प्रभाकर (शाहीर) – प्रभाकर जनार्दन दातार
५२. फडकरी – पुरुषोत्तम धाक्रस
५३. फरिश्ता – न. र. फाटक
५४. बाकीबाब – बाळकृष्ण भगवंत बोरकर
५५. बाबा कदम – वीरसेन आनंद कदम
५६. बाबुराव अर्नाळकर – चंद्रकांत सखाराम चव्हाण
५७. बाबुलनाथ – वि. शा. काळे
५८. बालकवी – त्र्यंबक बापूजी ठोंबरे
५९. बाळकराम (विनोदासाठी) – राम गणेश गडकरी
६०. बी – नारायण मुरलीधर गुप्ते
६१. बी रघुनाथ – भगवान रघुनाथ कुलकर्णी
६२. बंधुमाधव – बंधु माधव मोडक (कांबळे)
६३. भटक्या – प्रमोद नवलकर
६४. भाऊ पाध्ये – प्रभाकर नारायण पाध्ये
६५. भानुदास – कृष्णाजी विनायक पोटे
६६. भानुदास रोहेकर – लीला भागवत
६७. भालचंद्र नेमाडे – भागवत वना नेमाडे
६८. मकरंद – बा. सी. मर्ढेकर
६९. मंगलमूर्ती – मो. ग. रांगणेकर
७०. मनमोहन – गोपाळ नरहर नातू

# मुस्लिम स्त्री कलाकार शमशाद बेगम



आजचा लेख हा सुप्रसिद्ध व हरहुन्नरी गायिका शमशाद बेगम यांच्यावर लिहीत आहे.

शमशाद बेगम या त्या काळातील प्रसिद्ध गायिका म्हणून गणल्या जातात. आजही त्यांची गाणी ऐकायला आवडतात आणि त्यांच्या आवाजाच्या जादूने आजही आपण मंत्रमुग्ध होतो. त्यांचा आवाज जितका धारदार होता तितकाच त्याला गोडवाही होता. म्हणजे धारदार आणि गोडवा असे मिश्रण त्यांच्या आवाजात होते. त्यांच्या आवाजाची रेंज खूपच मोठी होती. त्या मंद्र सप्तकापासून तार सप्तकापर्यंत कुठच्याही सप्तकात गाऊ शकत होत्या.

शमशाद बेगम यांचा जन्म १४ एप्रिल १९१९ रोजी लाहोर येथे झाला. काही जणांच्या मते त्यांचा जन्म अमृतसर येथे झाला असे आहे .परंतु त्यांचा जन्म लाहोर येथे झाला. त्यांच्या जन्माच्या दुसऱ्या दिवशी अमृतसरमध्ये जालियनवाला बाग हत्याकांड घडले. शमशाद बेगम यांना एकंदर सात भावंडे होती.

शमशाद बेगम या जेव्हा तेरा वर्षाच्या होत्या तेव्हाच त्यांचे गणपत लाल बट्टो या तरुणावर प्रेम जडले. गणपत लाल बट्टो हे कायद्याचे शिक्षण घेत होते. यांच्या लग्नाला दोन्हीही घरांमधून विरोध होता. परंतु या विरोधाला न जुमानता त्या दोघांनी १९३४ साली लग्न केले. गणपत लाल बट्टो यांनी शमशाद यांना गायिका म्हणून प्रसिद्ध होण्यासाठी खूप मदत केली. त्यांनी तिला भरपूर प्रोत्साहन दिले. आणि तिने गायिका होण्यासाठी भरपूर प्रयत्नही केले. कोणाबरोबर कॉन्ट्रॅक्ट करायचे वगैरे सर्व गणपत लाल बट्टो पाहत असत. त्या दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम होते.

१९५५ साली गणपत लाल बट्टो हे अपघातात मरण पावले. त्यामुळे शमशाद यांचा आधार तुटल्यासारखा झाला. आणि त्या खचून गेल्या. शमशाद बेगम यांनी निरनिराळ्या भाषांमध्ये एकंदर सहा हजार गाणी म्हटली आहेत. आणि त्यापैकी १२८७ गाणी ही हिंदी चित्रपटातील आहेत.

ती बारा वर्षाची असताना तिचे काका तिला झेनोफोन या म्युझिक कंपनीमध्ये घेऊन गेले. तिथे तिच्या आवाजाची चाचणी करण्यात आली. तिथे कंपोजर हे गुलाम हैदरच होते. गुलाम हैदर यांना तिचा आवाज खूपच आवडला. आणि तिच्या आवाजाने ते भारावून गेले .

गुलाम हैदर यांनी तिच्याबरोबर बारा गाण्यांसाठी कॉन्ट्रॅक्ट केले. परंतु ते कॉन्ट्रॅक्ट जेव्हा झाले तेव्हा शमशादच्या वडिलांनी अशी अट घातली की तिने बुरख्यामध्येच गाणं म्हटलं पाहिजे. आणि तिचा कसलाही फोटो काढायचा नाही. या अटीवरच ते कॉन्ट्रॅक्ट ठरले.

या कॉन्ट्रॅक्टच्या प्रत्येक गाण्याच्या वेळी गुलाम हैदर यांनी शमशाद यांना मोठ्या गायकाला ज्या सुविधा देतात त्या सर्व सुविधा तिला दिल्या. शमशादला या प्रत्येक गाण्याचे पंधरा रुपये मिळाले आणि बारा गाण्यांचे कॉन्ट्रॅक्ट संपल्यानंतर गुलाम हैदर यांनी तिला पाच हजार रुपये दिले.

या कॉन्ट्रॅक्ट मधील गाणी जेव्हा शमशाद यांनी गायली त्यावेळी त्यांनी गायनाचे शिक्षण घेतलेले नव्हते. परंतु नंतर गुलाम हैदर यांनी त्यांना गायनाचे शिक्षण दिले. त्यानंतर १९३७ ला शमशाद बेगम यांनी ऑल इंडिया रेडिओ पेशावर आणि लाहोर येथे गाणी म्हटली. आणि तोच त्यांच्या गायिकेच्या प्रवासातील

महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यानंतर निर्माते पंचोली यांनी शमशाद यांना सिनेमात काम करण्याचीही ऑफर दिली. शमशाद बेगम त्याला तयार झाल्या. परंतु शमशादच्या वडिलांना याचा भयंकर राग आला. आणि त्यांनी शमशादला सांगितले की तू जर सिनेमात काम केलेस तर तुला गाणं पण बंद करायला लागेल. आणि अभिनय पण बंद करायला लागेल.

त्यामुळे शमशाद यांनी आपल्या वडिलांना वचन दिले की मी सिनेमात काम करणार नाही .नंतर मेहबूब खान यांनी शमशादला मुंबईला घेऊन जातो असं तिच्या नवऱ्याला सांगितलं आणि त्यांनी सांगितलं की तिला मी सिनेमातली गाणी गायला देईन. त्याशिवाय तिला फ्लॅट व  कार मिळेल. आणि तिच्याबरोबर तीन-चार तिच्या कुटुंबातील आले तरी त्यांचाही खर्च मी करेन .शमशाद यांचे यजमान त्याला तयार झाले. परंतु तिच्या वडिलांनी आधी विरोध केला पण नंतर त्यांचे काही चालले नाही. शमशाद यांचा आवाज इतर गायिकांपेक्षा म्हणजे नूर जहा, सूरैया, गीता दत्त वगैरेंच्या पेक्षा वेगळा असल्यामुळे ती नॅशनल स्टार बनली.

गुलाम हैदर यांच्या खजांची या सिनेमांमध्ये शमशादनेच गाणी म्हटली आहेत.

नंतर १९४० साली 'यमला जाट' या नावाचा सिनेमा आला. हा सिनेमा पंजाबी मध्ये होता. आणि या सिनेमातील शमशाद बेगमची गाणी खूपच गाजली. आणि या सिनेमातील अभिनेता प्राण त्यालाही त्यामुळे प्रसिद्धी मिळाली. नंतर शमशाद यांनी ओपी नय्यर, नौशाद, एस.डी. बर्मन, सी. रामचंद्र वगैरे संगीत दिग्दर्शकांच्या दिग्दर्शनाखाली गाणी म्हटली.

जमीनदार, पूंजी व शमा या सिनेमात शमशाद यानी गाणी म्हटली. त्या ३ ही सिनेमांचे संगीतकार होते गुलाम हैदर. मेहबूब खान यानी तकदीर या सिनेमासाठी शमशादचाच आवाज वापरला. त्याची हिरॉइन होती नर्गिस. नौशाद यानी ते प्रसिद्ध झाले त्याचे सर्व श्रेय शमशाद यानाच दिले आहे. त्यानंतर आला मदर इंडिया. या सिनेमातील १२ पैकी ४ गाणी शमशाद यानी म्हटली आहेत.

बट्टो यांच्या निधनानंतर १ ते १।। वर्षे शमशादने गाणे बंद केले होते. पण मदर इंडिया पासून त्या परत गायला लागल्या. शमशाद यानी गायलेल्या गाण्यांपैकी १२ सुपरहिट गाणी खाली देत आहे.

- कही आर कही पार लागा तीरे नजर (आरपार)
- बूझ मेरा क्या नाम रे (सी.आय.डी.)
- कही पे निगाहे कही पे निशाना (सी.आय.डी.)
- मेरी निंदोमे तुम मेरे ख्वाबोमे तुम (नया अंदाज)
- दूर कोई गाये धुन ये सुनाये
- लेके पहिला पहला प्यार भरके आखोमे खूमार (सी.आय.डी.)
- ओ गाडी वाले गाडी धीरे (मदर इंडिया)
- मेरे पिया गये रंगून वहासे किया है टेलीफोन
- लेके पहला पहला प्यार
- कजरा मोहब्बत वाला
- सैया दिल मे आना रे आके फिर ना जाना रे
- रेशमी सलवार कुर्ता जाली का

लता व आशा या मंगेशकर भगिनी आल्यानंतर शमशादची जादू हळूहळू कमी व्हायला लागली. सुमारे ४३ वर्षे त्यानी आपल्या बहारदार, सुमधूर,जादूमयी व अफलातून अशा आवाजाने हिंदी चित्रपट रसिकाना मंत्रमुग्ध केले.


लतादीदी व आशाताई यांनासुद्धा त्यानी शमशाद यांच्या स्टाईल मधे गाणे म्हणावे असा आग्रह संगीतकार करत असत. लतादीदी व आशाताई यानी सुरुवातीला शमशाद च्या स्टाईल मधे गाणी म्हटलीआहेत.

अशी ही अफलातून गायिका हिंदी चित्रपटसृष्टीवर राज्य करून वयाच्या ९४ व्या वर्षी अनंतात विलीन झाली.

**- प्रकाश गणेश गानू.**

मोबा. ९४२१९२९८४७

# देशभक्त दिनकरशास्त्री रानडे



असा एक स्वातंत्र्यवीर... ज्याने दूरवर असलेल्या बुलाडाणा शहरात आपल्या कार्याने जनमानसात स्थान मिळविले होते आणि ज्यांचा जन्म आपल्या रत्नागिरी जिल्ह्यात झालेला असूनही आपल्याला मात्र अपरिचित आहेत, ते म्हणजे कै. दिनकरशास्त्री कानडे !

दिनकरशास्त्रींचा जन्म गुहागर तालुक्यातील नरवण गावी झाला. जन्मतारीख उपलब्ध नाही, मात्र त्यांनी लिहिलेल्या आपल्या आत्मचरित्रात मे १८८६ साल लिहिलेले आहे. त्यांचे वडील भिक्षुक होते. घरची परिस्थिती अत्यंत दयनीय होती. प्राथमिक अक्षरओळख झाल्यानंतर गुहागर आणि नंतर मुंबईला चौथीपर्यंत शिकले. १८९६ साली प्लेगची साथ आल्याने मुंबई सोडून पुन्हा नरवणला यावे लागले. थोड्याच दिवसांत आईचे नवज्वराने निधन झाले. लहान वयातच वडिलांनी घरातून बाहेर काढले. शेवटी एका परिचित गृहस्थांनी त्यांना चिपळूणला पाठविले.

चिपळूणला त्यांचे काका न्यायालयात नाझर होते. काकांनी नाईलाजाने ठेवून घेतले. दिनकरला इंग्रजी शिकायचे होते, मात्र काकांनी मराठी शाळेत घातले. चळवळ्या दिनकरने गावातील शंकराच्या देवळात आपल्या सवंगड्यांसमवेत लहानसा सार्वजनिक गणेशोत्सव केला. या उत्सवात स्वत: लिहिलेला 'उद्योगधंद्याचे महत्व' हा निबंध समोर जमलेल्या १७-१८ श्रोत्यांसमोर वाचला. दिनकरशास्त्री म्हणतात यावर 'हाच माझा सार्वजनिक कार्यप्रवेश'. शाळेतल्या गणेशोत्सवात दुसऱ्या दिवशी 'आपला देश, आपला धर्म' या विषयावर विद्यार्थी, शिक्षक व काही नागरिक अशा १५० लोकांसमोर व्याख्यान दिले. सार्वजनिक जीवनातले पहिले व्याख्यान चिपळूणच्या शाळेत झाले. अखेर इंग्रजी शिकायचे हा निर्धार करून चिपळून सोडून रत्नागिरीला गेले. माधुकरी मागून शिकू लागले. तिथून पुण्याला गेले. त्या शाळेत एक वर्षात दोन-तीन इयत्तांचा अभ्यास करून घेत. ही शाळा राष्ट्रीय विचारांची होती. इथे ते मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. याचवेळी त्यांनी निर्णय घेतला आपण पूर्णपणे देशकार्याला वाहून घ्यायचे.

१९०५ साली बनारसला काँग्रेसचे अधिवेशन झाले. लोकमान्यांनी काँग्रेसची चळवळ चालवण्यासाठी प्रचारक तयार करून संघटना वाढविण्याचा विचार मंडला. दिनकरशास्त्रींनी आपण पुढील आयुष्य देशकार्याला अर्पण करण्याचा निश्चय करून घरी वडिलांना पत्र लिहून 'तुमचा मुलगा यापुढे तुमच्या घराण्यास वा तुम्हा सर्वांस अंतरला. त्याने विवाह व नोकरी न करण्याचा निश्चय करून आयुष्य स्वदेश सेवेस अर्पण केले आहे. कुळाचे दृष्टीने तो प्लेगने मेला असे समजावे. स्वदेशसेवा करीत असता मेलेला कळेल तेव्हा त्यास स्वर्ग मिळून त्याने सर्व कुलाचा उद्धार केला असे समजावे.' असे कळविले. नंतर तळेगावला राष्ट्रीय शाळेत ते शिक्षक म्हणून

गेले. ती शाळा इंग्रजांनी बंद पाडल्यानंतर इंग्रजांचा वरवंटा सर्वत्र फिरू लागला. आता व्याख्याने देण्यावरही गंडांतर आले. अखेर निदान धार्मिक प्रवचनातून देशकार्य करता येईल त्यासाठी धर्म शिक्षण हवे म्हणून ते वाईला केवलानंद सरस्वतींच्या प्रज्ञापाठशाळेत शिकायला गेले. तिथे १९१४ साला पर्यंत राहिले. या शिक्षणामुळेच दिनकर लक्ष्मण कांदे हे दिनकरशास्त्री कानडे झाले. या प्रज्ञापाठशाळेत त्यांच्या समवेत शिक्षण घेणारे होते आचार्य विनोबाजी.

दिनकरशास्त्री यांना वक्तृत्त्वाची ईश्वरदत्त देणगी लाभली होती. त्यांनी गीता प्रवचनातून लोकमान्यांनी दिलेली कर्मयोगाची शिकवण देण्यासाठी गावोगाव व्याख्याने दिली. लोकमान्यांच्या गीतारहस्याला विरोध करणारा एक मोठा गट त्यावेळी महाराष्ट्रात होता. वाईचे भाऊशास्त्री लेले हे त्यांचे अध्वर्यू ! भाऊशास्त्रींचे व्याख्यान जिथे होईल तिथे दिनकरशास्त्री दुसऱ्या दिवशी व्याख्यान देऊन भाऊशास्त्रींचा यथायोग्य समाचार घेत. लोकमान्यांच्या निधनानंतर शास्त्रीबुवांनी महात्माजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत पुन्हा एकदा झोकून दिले. अनेकवेळा कारावास सोसला.

गदर पार्टीशी संबंध आला व ते अमेरिकेला गेले. तिथे बर्कले विद्यापीठातून अर्थशास्त्राची एम.ए. ची पदवी मिळविली. मात्र तिथे त्यांना प्लूरसीची बाधा झाली. त्यात एक फुफ्फुस निकामी झाले. भारतात आल्यानंतर कोरड्या हवेत रहावे म्हणून नागपूरला गेले. मात्र तिथली हवा मानवली नाही. नागपूरला बुलढाण्याचे लोक आले होते. त्यांनी शास्त्रीबुवांना बुलढाण्यात येण्याचा आग्रह केला आणि ते बुलढाण्याला गेले. पुढची जवळजवळ तीस वर्ष ते तिथेच राहिले. त्या काळात सुद्धा नगरपालिकेतील सत्ताधारी भ्रष्टाचार करणारी मंडळी होतीच. १९३७-३८ या वर्षात नगरपालिकेतील सत्ताधारी भ्रष्टाचार केल्यामुळे तुरुंगात गेले. पालिकेची इमारतसुद्धा कर्जामुळे गहाण पडली होती. निवडणुका झाल्या. शास्त्रीबुवां निवडणुकीला उभे नव्हते. पण नागरिकांनी आग्रह करून त्यांना नगराध्यक्ष व्हायला लावले. १९३८ ते १९४१ या तीन वर्षात उत्तम कारभार करून पालिका कर्जमुक्त केली. ४१ साली काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा असहकाराची हाक देताच निस्पृहपणे दिनकरशास्त्रींनी पालिकेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

वऱ्हाड हा तेव्हा मध्य प्रांतात होता. १९४६ साली मध्य प्रांताच्या कायदे मंडळाची निवडणूक झाली. बुलढाण्यातून दिनकरशास्त्री निवडून आले. रविशंकर शुक्ल मुख्यमंत्री तर घनश्यामदास गुप्त अध्यक्ष आणि शास्त्रीबुवा उपाध्यक्ष झाले. १९५२ साली विदर्भातर्फे मुंबई राज्य विधानपरिषदेवर प्रतिनिधी म्हणून निवडून गेले होते. बुलडाणा भागातील क्षय रोगाला प्रतिबंध करण्यासाठी त्यांनी लोकवर्गणीतून तीन लाख रुपये गोळा करून शासनाला दिले. त्यातून सरकारने क्षयरोग आरोग्यधाम सुरू केले. याशिवाय नॉर्मल स्कूल, ग्रामसेवक प्रशिक्षण शाळा, गांधीभवन, टिळक नाट्य विद्यामंदिर या संस्था सुरू केल्या. शरीर थकले तरी समाजसेवेचे व्रत अखंड राहिले. अखेर २८ सप्टेंबर १९५७ रोजी हा कर्मयोगी नश्वरदेह सोडून गेला. शास्त्रीबुवांनी स्वत:बद्दल म्हटलं होतं, ''मी स्वत: निष्कांचन राहिलो. द्रव्यार्जन कोणत्याच मिषाने मी केले नाही. इतकी वर्ष मी जगेन असे कधी न वाटल्याने वृद्धापकाळाची तरतूद ही कल्पनाच मला नव्हती... सन्यस्त वस्त्रे परिधान न करताही मी १९२६ साली येथे आलो तेव्हापासून असाच राहिलो, मला त्यात फार आनंद आहे.''

अपरांताचा हा पुत्र दूर वऱ्हाडात प्रचंड समाजकार्य करून गेला ! आम्हाला मात्र त्याची वार्ताही नाही !

**- प्रकाश देशपांडे**

मोबा.

# आयुर्वेदातील आहार फायदेशीर - डॉ. अरविंद लिमये



आयुर्वेदात सांगितलेल्या आवश्यक बाबी आणि धार्मिक पूजा परंपरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तू या जीवनसत्त्व देणाऱ्या गोष्टी आहेत. यांचा उल्लेख आणि महत्त्व आयुर्वेदात सांगितले आहे. रोजच्या आहारात यांचा वापर हा आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल असे प्रतिपादन पुणे येथील ज्येष्ठ आहारतज्ज्ञ डॉ. अरविंद लिमये यांनी केले.

मंगलधाम येथे शनिवारी ब्राह्मण सभा करवीर, चित्पावन संघ, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सारस्वत विकास मंडळ, बीबीएफ, बीबीएन व सर्व ज्ञाती संस्थांच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यानात डॉ. अरविंद लिमये बोलत होते. नंदकुमार मराठे यांनी स्वागत केले. कार्यवाह श्रीकांत लिमये यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मानसी कुलकर्णी यांनी परिचय करून दिला. उपाध्यक्ष वृषाली कुलकर्णी यांनी आभार मानले. यावेळी चित्पावन संघाचे प्रसाद भिडे, केदार जोशी यांच्यासह अनेक श्रोते उपस्थित होते.

डॉ. लिमये म्हणाले, 'पूजेसाठी लागणाऱ्या साहित्यामध्येच अनेक जीवनसत्त्वे आहेत. उदा. पूजेच्या वेळी लागणारी विड्याची पाने, खारीक, बदाम, सुपारी यामध्ये भरपूर जीवनसत्वे असतात. या वस्तू केवळ पूजा करण्यासाठीच न वापरता, त्या आपल्या नित्य आहारात याव्यात हा या पूजेमागील मुख्य उद्देश आहे. रक्तातील चरबी, मधुमेह, कॅन्सर यांसारख्या बऱ्याच व्याधी या समतोल आहार नसल्यामुळेच होतात याकडे सर्वांनी जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. आयुर्वेदात आपल्या प्रकृतीनुसार आहार सांगितलेला आहे.'

लिमये यांचा सत्कार ब्राह्मण सभेचे अध्यक्ष संतोष कोडोलीकर, चित्पावन संघाचे अध्यक्ष मकरंद करंदीकर आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे धर्मराज पंडीत आणि आंबेकर यांच्या वतीने करण्यात आला.

## ❊ महत्त्वाची सूचना ❊

हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने मराठी महिन्याची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आलेली आहे. सभासदांनी ती संघ कार्यालयातून घेवून जावी ही विनंती. ह्या दिनदर्शिकेमध्ये 'ब' या मुळाक्षरापासून सुरू होणाऱ्या आडनावांची छपाई नजरचुकीने राहून गेली आहे, त्याबद्दल सर्व संचालक मंडळ दिलगीरी व्यक्त करीत आहे. तसेच अशा आणखी काही त्रुटी जर कोणाला आढळल्यास त्या संघाच्या निदर्शनास आणून द्याव्यात, जेणेकरून यापुढे त्या चुका टाळण्यास मदत होईल. सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा.

– अध्यक्ष

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO

TÜV CERT
DIN EN ISO 9001:2000
CERTIFICATE: 01 100 028964
C-DOT
R.D.S.O.




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.